# राशिभविष्य - मार्च, २०२०

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==========================================================

**(१) मेष -** सध्या या राशीच्या प्रथम स्थानी हर्षल हा विक्षिप्त ग्रह असल्यामुळे या मंडळींचा स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असावा, असे वाटते. त्यामुळे कोणी समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या तर ते अपमानास्पद वाटत असणेही शक्य दिसते. पालकांनी या राशीच्या लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी. . कारण या काळात ती अतिशय खोडकर, मस्तीखोर, उपद्व्यापी होणे संभवते. असे असले तरी हा हर्षल शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. हर्षलसह शुक्र असल्याने वैवाहिक जीवनातील सुख समाधान मिळेल; पण हर्षलमुळे त्यात थोडी बाधा येणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला राहू कर्तृत्वास अनुकुल असला तरी त्याच्यामुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी केतू, मंगळ . व गुरु ते तीन ग्रह आहेत. पण गुरूमुळे प्रवासाचे योग असले तरी मंगळामुळे प्रवासात त्रास व मनस्ताप होणे संभवते. जपा. केतूमुळे "वरून कीर्तन, आतून तमाशा" अशा प्रकारचे ढोंगी आचरण होणे संभवते. शिवाय या केतूमुळे संततिसुखात बाधा येणेही संभवते. जपा. या राशीच्या दशम स्थानी स्वतःच्या मकर राशीत शनि असून महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ व गुरु हे दोन्ही ग्रह दशम स्थानी जात आहेत. त्यामुळे महिन्याचा पूर्वार्ध लोखंड, कोळसा यांचा व्यापार असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना गुरु -शनि हे ग्रह अनुकुल व प्रगतिकारक होतील; पण मंगळामुळे स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. पण हा मंगळ औषध विक्रेते व यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. पण काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तो मोह टाळावाच. या महिन्याचा पूर्वार्ध या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना रवि-बुध अनुकुल असल्याने काही ना काही प्रकारे लाभदायक होईल. कोणाला. बढती, कोणाला पगारवाढ, कोणाला एखादे उच्च पद किंवा मानाचे स्थान मिळणेही संभवते. उलट या राशीच्या व्यावसायिकांना आर्थिक चिंता, आर्थिक घोटाळे, अर्थप्राप्तीस होणारा विलंब सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. बुधामुळे नवीन मित्र मिळाले तरी मंगळ ग्रहामुळे मैत्रीत वितुष्ट येण्याची शक्यता आहे. जपा. या महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या व्ययस्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल; व त्यामुळे मनस्तापकारक घटना घडल्यास नैराश्य येणे संभवते. मनस्थिती अस्वस्थ राहील व काहींना आर्थिक चिंता त्रस्त करील. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकूल होईल व मन शांत राहील. दररोज स्नान करून २१ वेळा "ओम गं गणपतये नमः:" मंत्राचा श्रद्धेने जप करा. तसेच "श्रीगणपति अथर्वशीर्षा"चे पठण करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होईल. काही मंडळींना वेतनवाढ तर काहींना बढती, काही मंडळींना प्रतिष्ठा तर काहींना एखादे मानाचे स्थान वा उच्च पद मिळणेही संभवते. बुधामुळे मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. नेपच्यूनमुळे मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण राहू व हर्षल प्रतिकुल असल्यामुळे काही मंडळींच्या कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. तसेच आर्थिक चिंताही होणे संभवते. हर्षलसारखा विक्षिप्त ग्रह व्ययस्थानी असल्यामुळे काहींच्या जीवनात शत्रुत्व निर्माण होणे संभवते; तर काहींना वाईट प्रसंगाला तोंड द्यावे लागण्याची

शक्यता आहे. जपा. पण शुक्र ग्रहाच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे होणारा मनस्ताप सुसह्य होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेले केतू-मंगळ प्रतिकुल असून गुरु ग्रहामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होणेही शक्य दिसते. पण केतू-मंगळ अनारोग्यकारक व वैवाहिक जीवनातील सुखात व कौटुंबिक सुखात बाधा आणणारे ग्रह आहेत. त्यांच्यामुळे काही मंडळींना त्वचारोग, काही मंडळींना उष्णताविकार, मूळव्याध, अशापैकी आजार होणे संभवते. काहींना छोट्या अपघातामुळे हाडमोड होणेही संभवते. तसेच पाण्यापासून धोका असल्याने खोल पाण्यात पोहू नका, जलप्रवास्कारू नका. तसेच विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या भाग्यस्थानी स्वतः:च्या मकर राशीत शनि ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ व गुरु हे दोन ग्रह भाग्यस्थानी जात आहेत. शनि ग्रह साधारण बरा असेल व त्याच्यामुळे. प्रवासयोग येऊ शकेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात प्रवास करू नका कारण मंगळामुळे प्रवासात त्रास, मनस्ताप, व मानहानी होणे संभवते. पण महिन्याच्या शेवटी गुरु ग्रह अनुकुल होणार असला तरी या राशीच्या मंडळींना केवळ आध्यात्मिक उपासनेस अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर कुलदैवताची व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती मिळेल. दररोज स्नान झाल्यावर नियमितपणे कुलदैवताचे स्तोत्र व “ हनुमानचालिसा “ स्तोत्राचे पठण करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्ध घरीदारी व नोकरीव्यवसायचे ठिकाणी प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. सप्तम स्थानी असलेले मंगळ -केतू वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील वाद,मतभेद अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशय, मतभेद अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. पण याच स्थानी स्वराशीतील गुरु ग्रह असल्यामुळे या राशीच्या विवाहेच्छूना विवाहयोग येणे संभवते. काहींचे प्रेमसंबंध निर्माण होतील; तर ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते दृढ होतील. अर्थलाभ होणेही शक्य आहे. काहींचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. ज्या गर्भवती स्त्रियांचा प्रसूतिकाळ या महिन्यात आहे त्यांना पुत्रप्राप्ती होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी स्वतः:च्या मकर राशीत शनि ग्रह असल्यामुळे काही मंडळींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल; तर काहीना अपेक्षाभंग, असमाधानकारक घटना यांचा मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ ग्रह या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर काहींना वात पित्त प्रकाराचे अनारोग्य त्रस्त करण्याची शक्यता आहे. उष्णता विकार बळावून काही मंडळींना मूळव्याधीचा आजार होणे संभवते. .काही मंडळींना छोट्या मोठ्या अपघातामुळे हाडमोड होणे संभवते. . काही मंडळींना गहिरे नैराश्य येणेही शक्य दिसते. तसेच जलभय , वीजभय असल्याने खोल पाण्यात पोहू नका. जलप्रवास करू नका. विजेची उपकरणे हाताळताना काळजी घ्या. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्ध प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. नोकरीत कामाचा ताण, वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत सुधारणा होईल. सुखसमाधान लाभेल. अध्यात्माची मनापासून ओढ असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या शुक्र- हर्षल ग्रहांमुळे आर्थिक व अन्य प्रकारचे सुखसमाधान लाभणार असले तरी मित्रांशी वाद, भांडणे होणे संभवते. जपा. या राशीच्या प्रथम स्थानी असलेला राहू शारीरिक-मानसिक दृष्ट्या अनारोग्यकारक आहे. काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करील; तर काही मंडळींना अपमानाचे दु:ख सहन करावे लागण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा

असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल व अनारोग्यकारक असल्याचाच अनुभव येईल. इच्छा आकांक्षा अपूर्ण राहतील. हाती घेतलेल्या जबाबदारीच्या कामात अपयश येणे संभवते. घरी मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. तसेच नोकरीत कामाच्या ताणामुळे मानसिक ताणही वाढेल. त्यामुळे भावनेच्या भरात कोठेही भरकटत जाल. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरीत वरिष्ठांचा व घरी वडीलधाऱ्या मंडळींचा विरोध सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. त्यामुळे काही मंडळींना नैराश्य येणे संभवते. परंतु बुध ,हर्षल अनुकुल असल्याने ज्यांचे बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र आहे अशा मंडळींना काळ प्रगतिकारक व यशदायक होईल. काही मंडळींना बढती मिळणेही संभवते. केतू, मंगळ व्यवसाय क्षेत्रास पूरक असल्यामुळे यांत्रिकतांत्रिक व कलात्मक कार्यक्षेत्र वा नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला नेपच्यून ग्रह जलभकारक व विषभयकारक असल्याने जलप्रवास करू नका व खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या सप्तम स्थानी स्वतः:च्या मालकीच्या मकर राशीत शनि ग्रह असल्याने या राशीच्या विवाहेच्छूना विवाहयोग संभवत नाही. शिवाय महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ -गुरु व व्यय स्थानी असलेला राहू प्रतिकुल असल्याने ठरलेल्या विवाह योगात बाधा येणे संभवते. तसेच विवाहित मंडळींच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जीवनसाथीचे अनारोग्य किंवा पतिपत्नीत होणारे वाद, मतभेद यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. पण शुक्र ग्रहाच्या काही प्रमाणातील अनुकुलत्तेमुळे परिस्थिती अटोक्यात राहील. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी महिन्याच्या उत्तरार्धात काहीही कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. पण व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे काही मंडळींना अर्थलाभ होईल; तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची व श्रीहनुमानाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे
व श्रीहनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या शुक्र-हर्षल ग्रहांमुळे या राशीच्या काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काही मंडळींना परदेशगमनाचे योग येतील. शुक्राच्या अनुकुलतेमुळे गुरुकृपा, थोरकृपा, सुसंगती, कीर्ती, प्रसिद्धी अशापैकी काही तरी मिळू शकेल. हर्षलमुळे शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना अपेक्षित प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या राहूमुळे नोकरीत अधिकार असणारांना अधिकाराचा दुरुपयोग करून वाममार्ग धन प्राप्त करण्याची तीव्र इच्छा उत्पन्न होईल. पण त्यांनी मनावर नियंत्रण ठेवून सरळ मार्गाने आचरण करावे. नपेक्षा होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. जुगाराचा नाद असणारांनीही मनावर ताबा ठेवून तो नाद सोडावा. अर्थप्राप्तीपेक्षा अर्थहानी होणेच शक्य आहे. या राहूमुळे संततीविषयक चिंता त्रस्त करण्याची शक्यताही आहे. जपा. या राशीच्या पंचम स्थानी स्वतः:च्या मालकीच्या धनु राशीत गुरु असून शिवाय मंगळ व केतू असे दोन ग्रहही आहेत. गुरूमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे सहज शक्य असले तरी इतरांना मंगळ -केतूमुळे संततिविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. काही मंडळींना स्थावरसंबंधीची समस्या त्रस्त करील. या राशीच्या गर्भवती

स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या षष्ठ स्थानी स्वतः:च्या मकर राशीत असलेला शनि ग्रह कोळसा, लोखंड संबंधी व्यवसाय असणारांना पूरक होईल, पण तो अनारोग्य कारक होण्याची शक्यताही आहे. शिवाय त्याच्यामुळे गैरसमज होणे, वाद, भांडणे होणे,शत्रुत्व निर्माण होणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ ग्रह या राशीच्या षष्ठ स्थानी आल्यावर शनि -मंगळ हे शत्रू ग्रह एकत्र येतील व त्यामुळे काही मंडळींना अपप्रचाराचा तर काहींना आर्थिक नुकसानीचा त्रास सहन करावा लागेल. शिवाय शारीरिक उष्णता भडकून अंगावर फोड येणे, ताप येणे, इजा होणे अशापैकी आजार होणे संभवते. काही मंडळींना हृदयविकाराचा आजार होणेही संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी असलेले रवि -बुध -नेपच्यून हे तिन्ही ग्रह वैवाहिक जीवनातील सुखास प्रतिकुल असून अनारोग्यकारक आहेत. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर स्वतः:चे अनारोग्य, संतति समस्या अशापैकी कारणांनी मनस्थिती अस्वस्थ होणे संभवते. त्यामुळे मन भरकटत जाईल. जपा. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना मन:शांती देऊ शकेल.

**(६) कन्या -** या राशीच्या चतुर्थ स्थानी धनु राशीत गुरु -मंगळ -केतू असे तीन ग्रह आहेत. मंगळ -केतु कौटुंबिक सुखसमाधानास बाधक आहेत. त्यामुळे कुटुंबात भांडणतंटे, वाद, गैरसमज, असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे.

पण स्वराशीतील गुरुमुळे काही मनोनुकुल घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे परिस्थिती अटोक्यात राहील. ज्यांचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार मनासारखे होणे अपेक्षित आहे ते व्यवस्थित पार पडतील. पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या पंचम स्थानी स्वतः:च्या मालकीच्या मकर राशीत शनि ग्रह आहे. त्यामुळे चिकाटीने, बुद्धिचातुर्याने परिश्रम करून जे काय प्राप्त करावयाचे ते महिन्याच्या प्रथमार्धात प्राप्त करणे शक्य होईल. पण स्वभाव संशयी, स्वार्थी, व्यवहारी होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ व गुरु या राशीच्या पंचम स्थानी जात आहेत. मंगळामुळे संततिविषयक समस्या त्रास करण्याची शक्यता आहे. काही मंडळींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ या बौद्धिक राशीत रवि -बुध -नेपच्यून असे तीन ग्रह आहेत. नेपच्यूनमुळे काही मंडळींना उगीचच आपल्याला एखादा आजार झाला असल्याची भावना त्रस्त करील . काहींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. जपा. रवि -बुध दशम या नोकरीव्यवसाय स्थानास पूरक असून रवि भाग्योदयकारक असल्याचा अनुभव येईल. त्याच्यामुळे हितशत्रू पराभूत होतील. बुधामुळे कार्यसिद्धी होईल व अर्थलाभ होणे संभवते. शिवाय दशम स्थानी असलेला मिथुन राशीतील राहूही अनुकुल असून त्याच्यामुळे काही मंडळींना बढती, काहींना एखादे अधिकार पद मिळू शकेल. क्वचित कोणाचा सन्मान केला जाणेही संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या सप्तम स्थानी जात असल्याने भाग्योदयकारक होणार असला तरी त्याच्यामुळे अनारोग्य होणे संभवते. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील तर क्वचित कोणास हृदयविकार होणेही संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत हर्षल व शुक्र असे दोन ग्रह आहेत. हर्षल अपघातकारक ग्रह आहे. त्यामुळे सतत सवधानतेने आचरण करा. वाहन नियंत्रित वेगानेच चालवा. . शुक्र ग्रह पूर्णपणे अनुकुल असून त्याच्यामुळे काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थप्राप्ती होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक

धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेशाची व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे स्नान झाल्यावर “श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे व “श्रीहनुमानचालिसा “ स्तोत्राचे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या पंचम स्थानी नेपच्यून असल्यामुळे सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अत्यंत भावनाशील झाली असावी, असे वाटते. पण ज्यांना अध्यात्माची मनापासून ओढ आहे त्यांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे सहज शक्य होईल. पण नेपच्यूनसह रवि -बुध हे ग्रह प्रतिकुल असल्यामुळे नोकरीत वरिष्ठांचा त्रास, स्वतः:चे अनारोग्य आणि घरी संततीपैकी कोणाचे आजारपण, नातेवाईक मंडळींपासून होणारी फारकत अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. शिवाय अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर नोकरी-व्यवसायास पूरक होईल व परिस्थितीत सुधारणा होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत शुक्र व हर्षल असे दोन ग्रह आहेत. पैकी शुक्र ग्रह वैवाहिक जीवनातील सुखास काही प्रमाणात अनुकुल असला तरी विक्षिप्त स्वभावाच्या हर्षलमुळे जीवन- संगिनीचे लहरी, विक्षिप्त आचरण, पतिपत्नीत होणारे वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. ज्यांचे भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहेत त्यांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या भाग्यस्थानी राहू असल्यामुळे प्रवासाचे योग येतील. पण प्रवासात इजा होणे संभवते. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी धनु राशीत गुरु-मंगळ -केतु असे तीन ग्रह आहेत. गुरु ग्रह स्वतः:च्या मालकीच्या धनु राशीत असल्याने व बौद्धिक क्षेत्रास अनुकुल असल्याने या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित होईल. पण या गुरूमुळे भावंडांपासून त्रास होण्याची शक्यता दिसते. जपा. मंगळामुळे धैर्य, हिंमत, महत्त्वाकांक्षा वाढेल, व कर्तबगारी सिद्ध होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा मंगळ या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर तेथेच स्वतः:च्या मालकीच्या मकर राशीत असलेल्या शनि या त्याच्या शत्रू ग्रहाच्या युतीत येत असल्यामुळे व दोन्ही ग्रहांना चतुर्थ स्थान अनुकुल नसल्यामुळे कौटुंबिक जीवनात भांडणे, गैरसमज, असमाधानकारक घटना, अन्य कटकटी अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना आणि श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या धनस्थानी गुरु-मंगळ -केतु असे तीन ग्रह आहेत. गुरु ग्रह कुटुंबिक सुखास अनुकुल असला व कुटुंबात शुभ घटना घडण्याची शक्यता असली तरी मंगळ -केतु प्रतिकुल असल्यामुळे काही मंडळींना उष्णताविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. विशेष करून डोळ्यात खुपऱ्या होणे, घसा, मान, दाढा दुखणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी स्वतः:च्या मकर राशित शनि ग्रह आहे. त्यामुळे काही मंडळींना नवी नोकरी किंवा आवडीचे अपेक्षित असे कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण भावंड विषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ ग्रह या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर धैर्य, हिंमत, महत्त्वाकांक्षा वाढेल, प्रवास योग येईल; पण प्रवासात इजा होणे संभवते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत रवि -बुध -नेपच्यून असे तीन ग्रह

आहेत. पैकी रवि - नेपच्यून हे दोन ग्रह विविध कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. बुधामुळे काही प्रमाणात गृहसौख्य व मित्रसुख मिळू शकेल; पण तो आर्थिक नुकसानकारक ठरण्याची शक्यता दिसते. येथील रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर अधिक प्रतिकुल होईल व नोकरीत वरिष्ठांचा जाच, घरी संततिविषयक समस्या, प्रिय जनांपासून होणारे दूरत्व, अशापैकी कारणांनी मनस्थिती अस्वस्थ होणे संभवते. त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणेही शक्य आहे. जपा. त्याशिवाय अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या षष्ठ स्थानी हर्षल व शुक्र असे दोन ग्रह आहेत. पैकी हर्षल ग्रह शास्त्रीय संशोधन कार्यास पूरक असला तरी या क्षेत्रातील मंडळींनी सतत अति खोल विचार करू नये. नपेक्षा मेंदूवर ताण पडून डोकेदुखी व मेंदूविकार होऊ शकेल. जपा. काही मंडळींना मुदतीचा ताप येणेही संभवते. शुक्र ग्रह मात्र प्रतिकुल असून उच्च गुणवत्ता असूनही अपेक्षित प्रगती होऊ शकणार नाही; कर्तृत्व सिद्ध करण्यास संधीच मिळत नाही. त्यामुळे काहीजण नैराश्य येऊन व्यसनाधीन होणे संभवते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या राहूमुळे वाममार्ग धन मिळविण्याची प्रबळ इच्छा निर्माण होईल. पण तो मोह टाळाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर “श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे ;पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या संपूर्ण काळात मंगळ -शनि हे शत्रु ग्रह प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. तसेच आर्थिक संकटांना सामोरे जाण्याची वेळ येणे संभवते. मंगळ ग्रह नोकरदार मंडळींना प्रतिकुल असून नोकरीत प्रतिकुल परिस्थिती निर्माण होणे संभवते. शिवाय स्वभाव हट्टी, जिद्दे असल्यास अकारण शारीरिक श्रम व दगदग होणे संभवते. त्यामुळे शारीरिक आरोग्य बिघडून काही मंडळींना उष्णताविकाराचा आजार त्रस्त करील. नेत्रविकार ,घसा, मान दाढा दुखणे, अशापैकी आजार होणे संभवते. अशा परिस्थितीत गुरु-केतु हे ग्रह बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना व लेखकांना अनुकुल व यशदायक होतील. ऐषाराम मिळेल व या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. पण या केतूमुळे वाहनधोका असल्यामुळे रस्त्याने सावधानतेने चाला , वाहन नियंत्रित वेगाने व नियमांचे पालन करूनच चालवा. या राशीच्या तृतीय स्थानी बुध -रवि -नेपच्यून हे तीन ग्रह आहेत. नेपच्यूनमुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होणे संभवते. पण हा नेपच्यून अध्यात्म, गूढ संशोधन कार्यास अनुकुल व प्रगतिकारक होईल. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना जलप्रवासाचे किंवा परदेशगमनाचे योग येतील. रवि गहाच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत विविध प्रकारचे लाभ होणे शक्य दिसते. धनलाभ व सर्व प्रकारचे सुख मिळेल. पण बुध ग्रह प्रतिकुल असल्याने शत्रुत्व निर्माण होणे, हितशत्रूंचा त्रास होणे संभवते. जपा . महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व त्यामुळे कौटुंबिक त्रास, अनारोग्य, कार्य दिरंगाई होणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी असलेले हर्षल व शुक्र हे दोन्ही ग्रह अनुकुल असून हर्षल उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. काहींना अंतर्ज्ञान शक्ती प्राप्त होणेही संभवते. येथील शुक्र ग्रह सर्व प्रकारच्या कलाक्षेत्रातील मंडळींना कलेसाठी कला या दृष्टीनेच अनुकुल व आनंददायक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेला राहू मनात कपटी विचार

निर्माण करण्याची शक्यता आहे. तसेच वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर " शिवलीलामृत"स्तोत्राचे व "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(१०) मकर** - या राशीच्या प्रथम स्थानी स्वतः:च्या मकर राशीत शनि ग्रह आहे. ती मंगळ ग्रहाची उच्च राशी आहे. शनि -मंगळ शत्रु ग्रह असल्यामुळे स्वतः:स व जीवनसंगिनीला अनारोग्यकारक आहेत. शिवाय नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे स्थलांतर वा दूरत्व झाल्यास मन अस्वस्थ होईल व नैराश्य येईल. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी असलेले मंगळ -गुरु ग्रह या राशीच्या प्रथम स्थानी आल्यावर तर या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत प्रतिकुल होतील व त्यामुळे अकारण श्रम, दगदग, शरीरपीडा होणे संभवते. शिवाय स्वभाव लहरी, हट्टी, मानी असा झाल्यास अधिकच मनस्ताप सहन करावा लागेल. महिन्याच्या पूर्वार्धात मंगळ ग्रह अधिक प्रतिकुल होणे संभवते. त्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील. सतत वाद, भांडणे, मानहानी होणे संभवते. आर्थिक चिंता त्रस्त करील. पण व्ययस्थानी मंगळासह गुरु ग्रहही स्वतः:च्या धनु राशीत असल्यामुळे होणारा मनस्ताप काही प्रमाणात सुसह्य होईल. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत रवि -बुध -नेपच्यून असे तीन ग्रह आहेत. हे तिन्ही ग्रह प्रतिकुल असल्यामुळे वाद, भांडणे, वित्तहानी , आर्थिक घोटाळे, आर्थिक चिंता, नेत्रविकार अशापैकी मनस्तापकारक घटना घडणे संभवते. बुध ग्रहही दु:खदायक असला तरी तो धनदायक होण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत गेल्यावर परिस्थितीत थोडी सुधारणा होईल व नोकरीत अनुकुल परिस्थिती निर्माण होईल. वरिष्ठ तुमच्या कामावर प्रसन्न होतील. त्यामुळे आरोग्य चांगले राहील व सर्व सुखाचेच होईल. काही मंडळींना बढती, क्वचित कोणास मानाचे स्थान किंवा उच्च पद मिळणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत हर्षल व शुक्र असे दोन ग्रह आहेत. हर्षलमुळे मन व बुद्धी विकृत होईल व त्यामुळे स्वभाव सतत तक्रारखोर असा होणे संभवते. कोणाशी पटणार नाही व आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही. पण शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. ज्यांची शेतीवाडी आहे अशाना त्यापासून लाभ होईल. हा शुक्र महिन्याच्या शेवटी या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर सर्व प्रकारच्या कलाकारांना आनंददायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मिथुन राशीत राहू असल्यामुळे हितशत्रूंवर विजय मिळेल. ज्यांचा अन्य जातिधर्माच्या मंडळींशी व्यावसायिक संबंध आहे अशांना अशा संबंधामुळे काळ लाभदायक होईल. पण या राहूमुळे काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. शिवाय तो विषभयकारक असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ नका. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना करा. दररोज स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री श्रीहनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ** - या राशीच्या प्रथम स्थानी रवि -बुध -नेपच्यून असे तीन ग्रह आहेत. पैकी नेपच्यूनमुळे मनस्थिती अतिशय कोमल घडणे संभवते. त्यामुळे मानसिक संवेदना अति प्रबळ झाल्यास मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहिरे नैराश्य येईल. अशा परिस्थितीत सोबत असणारे रवि - बुध हे दोन्ही ग्रह प्रतिकुल असल्यामुळे पीछेहाट होणे, मनस्ताप होणे, थकवा येणे, अनारोग्य होणे संभवते. काही मंडळींना रक्तविकाराचा किंवा हृदयविकाराचा आजार होणे संभवते. त्यात भर

म्हणून प्रतिकुल बुधामुळे धननाश होणे, मित्रद्रोह होणे संभवते. काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणेही शक्य दिसते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या धनस्थानी गेल्यावर अधिक प्रतिकुल होईल व त्यामुळे वाढता खर्च, अन्य आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्याची चिंता त्रस्त करील. त्यामुळे वाद, भांडणे होणेही संभवते. काही मंडळींना नेत्रविकाराचा आजार होणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेले शुक्र-हर्षल हे दोन्ही ग्रह अनुकुल असून येथील हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळणेही शक्य आहे. शुक्रामुळे .काही मंडळींना धनलाभ, तर काहींना भूमिलाभ होणे संभवते. काही मंडळींना मान, प्रतिष्ठा मिळणेही शक्य आहे. तसेच या राशीच्या व्यापारी मंडळींना या शुक्रामुळे स्त्रीग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. येथील शुक्र महिन्याच्या अखेरीस या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर कौटुंबिक सुख व गृहसौख्य मिळेल. शेतीवाडीपासून लाभ होईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेला राहू ज्यांचा दलाली कमिशनवर व्यवसाय आहे त्यांना लाभदायक होईल. पण त्याच्यामुळे विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. या काळात या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या लाभस्थानी धनु राशीत मंगळ -गुरु -केतु असे तीन ग्रह असून ते तिन्ही ग्रह विविध प्रकारे लाभदायक होतील. मंगळामुळे एखादी मौल्यवान वस्तू मिळणे संभवते. पण कष्ट-परिश्रम करूनच अर्थलाभ होईल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे काही मंडळींना वाहनसुख, तर काही मंडळींना धनलाभ होणे संभवते. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींना विवाहयोग येणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. केतुमुळे प्रवास योग येईल. या राशीच्या व्यय स्थानी असलेला शनि ग्रह असह्य मनस्तापकारक होणे संभवते. या काळात सर्व आर्थिक व्यवहार जपून व सावधानतेनेच करा. एखादे मोठे संकट आल्यास मानहानी होईल. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात लाभस्थानी असलेले मंगळ -गुरु ग्रह या राशीच्या व्यय स्थानी गेल्यावर काळ अधिकच प्रतिकुल होईल; म्हणून काळ शनि ग्रहाच्या साडेसातीचा असल्याने सतत मनावर संयम ठेवून, बुद्धी स्थिर राखून व सहनशील बनूनच आचरण करा. तेच सुखाचे होईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर "श्रीशिवलीलामृत स्तोत्रा"चे व रात्री "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा.

**(१२) मीन -** या राशीच्या व्यय स्थानी रवि -बुध -नेपच्यून असे तीन ग्रह आहेत. येथील नेपच्यून मानसिक व्यग्रता, नैराश्य आणणारा असून चिंताजनक असणार आहे. पण तो गुप्त पोलिसखात्यात कार्यरत असणारांना अनुकुल होईल. पण रवि -बुध पूर्णपणे प्रतिकूल असून त्यांच्यामुळे अपयश, मानहानी, आर्थिक चिंता, मानसिक अस्वस्थता, अनारोग्य होणे संभवते. येथील रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम स्थानी गेल्यावर आर्थिक चिंता, पीछेहाट व मनस्ताप यामुळे अनारोग्यकारक होईल व त्यामुळे थकावट जाणवेल. ज्यांना रक्तदाब, हृदयविकार असे आजार आहेत त्यांनी सहनशील बनून मन स्थिर व शांत राखण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. या राशीच्या धनस्थानी शुक्र व हर्षलसारखा विक्षिप्त, अति अस्थिर मनाचा व फटकळ स्वभावाचा ग्रह आहे. त्यामुळे या राशीच्या मंडळींच्या अविचारी बोलण्याने समोरच्याचा अपमान होईल. जपा. शिवाय अविचाराने खर्च होणे व सतत विचित्र, विक्षिप्त आचरण होणे संभवते. जपा. पण शुक्र ग्रहाच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. हा शुक्र महिन्याच्या अखेरीस या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर लाभदायक होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मिथुन राशीत राहू आहे. तो प्रतिकुल असून त्याच्यामुळे वाद, भांडणे, गैरसमज अशापैकी कारणांनी कौटुंबिक

जीवनातील सुखात बाधा येणे शक्य दिसते. जपा. या राशीच्या दशम स्थानी धनु राशीत गुरु-मंगळ-केतू असे तीन ग्रह आहेत. येथील केतूमुळे या राशीच्या काही जणांना कामाच्या ताणामुळे किंवा अन्य कारणाने हातची नोकरी सोडून नवीन काही करण्याची तीव्र इच्छा होईल. पण त्यांनी तसे करू नये. आहे तो नोकरीव्यवसायच मनापासून करावा. येथील मंगळ ग्रहामुळे स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता आहे. पण हा मंगळ औषध विक्रेते व यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना अनुकुल होईल. येथील स्वराशीतील गुरु बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक आणि लाभदायक होईल. नोकरीत वरिष्ठ खूष होतील व काहींना बढती, मानसन्मान असे काही मिळू शकेल. या राशीच्या लाभस्थानी स्वतः च्या मकर राशीत शनि ग्रह आहे. तो साधारण शुभ असल्यामुळे अर्थलाभ होणे संभवते. पण हा शनि मुलांपैकी कोणास कसला त्रास असल्यास संततिसुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात अखेरच्या सप्ताहात दशम स्थानी असलेले मंगळ -गुरु हे दोन्ही ग्रह या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर काही प्रमाणात अनुकुल होतील. काही मंडळींना अर्थलाभ तर काही मंडळींना एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभ होईल. पण या मंगळामुळे मित्रांशी वितुष्ट येण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेवदत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज स्नान केल्यावर नियमितपणे “बावन्नश्लोकी गुरुचरित्रा “चे पठण करा.

===== ooooo0ooooo=====